'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 3
ISSN : 2348-7143 (Online)
July-Sept.-2014

# मालेगांव तालुक्यातील लोकसंख्या बदलाचे विश्लेषण (१९५१ ते २०११)

डॉ. ए. डी. पवार
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
एम.जी. व्ही. कला महाविद्यालय, सौंदाणे,
ता. मालेगांव, जि. नाशिक – ४२३२०८.

**प्रस्तावना :**

लोकसंख्या बदल ही निरंतर घडणारी प्रक्रिया आहे. प्रादेशिक विकासाबरोबर लोकसंख्येत बदल घडून येतात. लोकसंख्येचा आकार हा प्रादेशिक रचना, वैशिष्टये व क्षेत्रिय वितरण यामध्ये झालेल्या बदलांमुळे कालक्रमानूसार परिवर्तनशील होतांना आढळते. एखादया प्रदेशाच्या, लोकसंख्येत वर्तमान आणि भूतकाळात होत गेलेल्या बदलांच्या स्वरूपावरून भविष्यकाळात ठराविक काळानंतर लोकसंख्येचा आकार व रचना कशी राहील याचा अंदाज करता येतो.

कोणत्याही देशातील लोकसंख्या ही इतर नैसर्गिक उत्पादन घटकांइतकीच महत्वाची असते. लोकसंख्येची वाढ व आर्थिक प्रगती ही उत्पादनासाठी लागणारे नैसर्गिक उत्पादक घटक व ते वापरले जाण्यासाठी लागणारी लोकसंख्या यावर अवलंबून असते. लोकसख्या व उपलब्ध साधनसंपत्ती यांचा नियोजनाबध्द मेळ घालूनच प्रदेश अथवा देश आपल्या आर्थिक विकासाबरोबर सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न करीत असतो.

एखादया विशिष्ट विभागाची भौगोलिक रचना, हवामान, पर्जन्यमान वनसंपत्ती, वन्यजीवन या सर्वांचा परिणाम मनुष्यबळाच्या जीवनमानावर होत असतो. लोकसंख्या त्यातील स्त्री–पुरूष प्रमाण, जाती–धर्मानुसार होणारी विभागणी, शैक्षणिक स्तर, उत्पादनाची साधने या सर्व घटकांवर नैसर्गिक साधनांचा परिणाम होतो. प्रास्ताविक विषयाच्या अनुषंगाने मालेगाव तालुक्यातील लोकसंख्या बदलाचा अभ्यास केलेला आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

नाशिक जिल्हयातील ऐतिहासिकदृष्टया महत्व असलेला मालेगाव तालुका उत्तर महाराष्ट्रातील ७४ अंश १५' ३०'' पूर्व व ७४ अंश ४५' ३०'' पश्चिम रेखांश तर २० अंश १५' ३०'' उत्तर व २० अंश २५' ३०'' उत्तर अक्षांश या दरम्यान समुद्रसपाटीपासून ४७३.४४ मीटर उंचीवर वसलेला आहे. भारतीय स्थाननिर्देशक नकाशान्वंये मालेगाव शहराच्या आग्नेयेस गिरणा–मोसम नदीच्या संगमाजवळून ४२० मी. उंचीची समोच्च रेषा गेलेली आहे.

**नाशिक जिल्हयातील अभ्यासक्षेत्र (मालेगाव तालुका) :**




नाशिक जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्राच्या संदर्भात निरनिराळया तालुक्यांनी व्यापलेल्या क्षेत्राचा विचार करता सर्वाधिक १२% क्षेत्र मालेगाव तालुक्याने व्यापलेले आहे. यापैकी २०% क्षेत्र नदीनाले, डोंगर दऱ्यांनी व्यापले आहे. मालेगाव तालुक्यात १४८ गावांचा समावेश झालेला असून २०११ च्या जनगणेनेनुसार तालुक्याची लोकसंख्या ९,५५,७६४ आहे. जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी १८२५.१३ चौ. कि. मी. क्षेत्र मालेगांव तालुक्याच्या वाटयाला आलेले आहे. तालुक्यात सर्वाधिक तापमानाची (४६.७ से.) नोंद २३ मे १९१६ रोजी तर सर्वात कमी (०.१८ से.) तापमानाची नोंद १९११मध्ये झालेली आहे.

मालेगाव परिसराच्या आर्थिक विकासाच्या क्षेत्रात भर घालणाऱ्या पूर्वीच्या हातमाग कापड उदयोगाचे यंत्रमागात रूपांतर होऊन आर्थिक परिवर्तन झालेले असून फळबागा शेतीमुळे आर्थिक भरभराटीस हातभार लावला आहे. तालुक्याची लोकसंख्या आणि विस्तार यामुळे जिल्हा निर्मिती प्रक्रियेत अनेक वर्षांपासून मालेगाव प्रतिक्षा यादीत सर्वोच्च स्थानावर आहे.

**उद्दीष्टये :**

१. मालेगाव तालुक्यातील लोकसख्यां बदलाचा अभ्यास करणे.

२. मालेगाव तालुक्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या वितरण अभ्यासणे

३. मालेगाव तालुक्यातील ग्रामीण व नागरी भागातील लिंगगुणोत्तर अभ्यासणे.

**मालेगाव तालुक्यातील लोकसंख्या (१९५१ ते २०११) :**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | प्रमाण | नागरी लोकसंख्या | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १९५१ | २१०३४७ | १४७८३० | ७०.२८ | ६२५१७ | २९.७२ |
| १९६१ | ३१३००८ | १८१२०२ | ५७.८९ | १३१८०६ | ४२.११ |
| १९७१ | ४२६१९१ | २२२५६७ | ५२.२२ | २०३६२७ | ४७.७८ |
| १९८१ | ५१७३०२ | २५८२१२ | ४९.९२ | २५९०९० | ५०.०८ |
| १९९१ | ६७२२२७ | ३१७१२३ | ४७.१७ | ३५५१०४ | ५२.८३ |
| २००१ | ७८८९६१ | ३३३११२ | ४२.२२ | ४५५८४९ | ५७.७८ |
| २०११ | ९५५७६४ | ३६८५२१ | ३८.५६ | ५८७२४३ | ६१.४४ |

**संदर्भ** : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन

अभ्यास क्षेत्रातील १९५१ ते २०११ या कालावधीतील लोकसंख्येचा अभ्यास केलेला आहे. १९५१ मध्ये तालुक्याची लोकसंख्या २,१०,३४७ होती त्यानंतर वीस वर्षात लोकसंख्या ४,२६,१९४ म्हणजे दुप्पट झालेली दिसून येते. याप्रमाणे लोकसंख्येत सतत वाढ होत जाऊन २०११ मध्ये तालुक्याची लोकसंख्या ९,५५,७६४ पर्यंत पोहचलेली आहे. मालेगाव तालुका हा नाशिक जिल्हयातील विस्ताराने व लोकसंख्येने सर्वात मोठा तालुका आहे. तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या तुलनेत नागरी लोकसंख्येत वेगाने वाढ झालेली आहे.

मालेगाव तालुक्यातील ग्रामीण आणि नागरी भागातील लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये विषमता दिसून येते. १९५१ मध्ये ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर अवघी ३० टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्यास होती. १९९१ मध्ये २ लाख ५८ हजार म्हणजे ५० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर २ लाख ५९ हजार म्हणजे ५० टक्के लोकसंख्या नागरी भागात झाल्याचे दिसून येते. यावरून तीस वर्षाच्या कालावधीत नागरी लोकसंख्या प्रमाणामध्ये वेगाने वाढ झालेली असुन नागरी भागाचे आकर्शण आणि धार्मिक कारणामुळे तुलनेने लोकसंख्या प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास येते. १९८१ ते २०११ या तीस वर्षाच्या कालावधीत ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ३८.३६ टक्के एवढे झाले तर नागरी लोकसंख्या प्रमाणात वाढ होऊन ते ६१ टक्क्यापर्यंत पोचलेले दिसून येते. यावरून नागरी भागातील सुखसुविधांच्या आकर्षणाचा

ग्रामीण भागातील शेती उत्पादनातील अनिश्चिततेचा आणि सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने मुस्लीम बहुल समाजाच्या एकवटलेपणाचा परिणाम नागरी लोकसंख्या वाढीत झालेला दिसून येतो.

**लिंगगुणोत्तर :**

| वर्ष | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ९८० | ९६५ | ९५१ | ९५४ | ९३९ | ९३० | ९२० |
| नागरी | ९४७ | ८९६ | ९३० | ९४७ | ९४० | ९५७ | ९६० |
| तफावत | –३३ | –६९ | –२१ | –०७ | +०१ | +२७ | +४० |

**संदर्भ :** भारतीय जणगणना अहवाल

१९५१ ते २०११ अभ्यासक्षेत्रामध्ये लोकसंख्या बदलाप्रमाणेच स्त्री–पुरूष प्रमाणातही तफावत असल्याचे निदर्शनास येते. १९५१ मध्ये दर हजार पुरूषांच्या तुलनेत ग्रामीण भागात स्त्रियांचे प्रमाण ९८० होते तर नागरी भागात ९४७ इतके होते. या जणगणना काळात ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रमाण अधिक होते. तुलनेने नागरी भागात लिंगगुणोत्तर ३३ ने कमी होते. १९५१ ते १९८१ या जणगणना कालावधीत लिंगगुणोत्तरामध्ये सतत घट होत गेलेली असून नागरी लिंगगुणोत्तर प्रमाणामध्ये तुलनेने वाढ झालेली दिसून येते. १९९१ मध्ये ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तर ९३९ तर दोनही भागामध्ये ते बरेच कमी होते. २००१ च्या जनगणना काळातील ग्रामीण भागामध्ये स्त्रियांचे प्रमाण ९३० तर नागरी भागातील हे प्रमाण ९५७ म्हणजे २७ ने अधिक होते. २०११ मध्ये ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तर ९२० तर नागरी भागातील हे प्रमाण ९६० हे जिल्हयातील सर्वात उच्च प्रमाण आहे. याबाबत असे निदर्शनास आले की, ग्रामीण भागामध्ये मुलगी जन्माला येणे म्हणजे काचेचे भांडे, नसती आफत, दुसऱ्याचे धन, हुंडा देऊन थाटामाटात लग्न यासारख्या कारणांचा प्रभाव दिसून आला तर नागरी भागात मुस्लीम बहुल लोकसंख्या अधिक असल्याने बहुपत्नीत्व पध्दत, गर्भपातास धार्मिक विरोध, हुंडा पध्दत अस्तित्वात नाही, मुलगा–मुलगी भेद नाही यासारख्या कारणामुळे नागरी भागांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ग्रामीण भागांच्या तुलनेत उच्च असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष :**

१. मालेगाव तालुक्यामध्ये लोकसंख्येत सतत वाढ झालेली आहे.

२. ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागातील लोकसंख्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

३. अभ्यास क्षेत्रामध्ये लिंगगुणोत्तर सर्वत्र कमी असून ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागामध्ये हे प्रमाण अधिक आढळते.

ISSN : 2348-7143 (Online)
July-Sept.-2014

**संदर्भ :**

१. सोलापूर जिल्हयातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येच्या लिंगगुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास – डॉ.लक्ष्मण बी. टोपणे. रिसर्च लिंक –Vol-VIII (2) April – 2009-13

२. नाशिक जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.

३. भारतीय जणगणना अहवाल.

४. District Census Hand Book Nashik.